**महावितरण** (TM)

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१**

दु.क्र.(का)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

---

**क्र. पी.आर-३/सबसिडी/** No 3 2019 **दिनांक :** 16 NOV 2012

**वाणिज्य परिपत्रक क्र.** १७८

**विषय :-** कृषीपंपधारक ग्राहकांना पूरविण्यात येणा-या शासनाच्या सवलतीच्या वीजदरात सुधारणा करणेबाबत.

**संदर्भ :-** १) शासन निणय क्र. विपुअ-२००५/प्र.क्र. २६९/ऊर्जा-३ दिनांक २७/०५/२००५.
२) शासन निणय क्र. विपुअ-२०१२/प्र.क्र. ९१/ऊर्जा-३ दिनांक ११/१०/२०१२.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दि. १६ ऑगस्ट २०१२ च्या विजदर आदेशान्वये विविध वर्गवारीतील वीज ग्राहकांसोबतच कृषीपंपधारक वीज ग्राहकांच्या वीजदरात सुधारणा केलेली आहे. मा. आयोगाने केलेल्या वीजदर वाढीच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने कृषीपंपधारक वीज ग्राहकांना देण्यात येणा-या सवलतीच्या वीज दरामध्ये शासन निर्णय क्र. विपुअ-२०१२/प्र.क्र. ९१/ऊर्जा-३ दिनांक ११/१०/२०१२ अन्वये खालीलप्रमाणे सुधारणा केलेली आहे.

१) राज्यातील कृषीपंपधारक ग्राहकांना पुरविण्यात येणा-या वीजेच्या दरात सवलत देण्यासाठी महावितरण कंपनीला शासनाकडून सध्या प्रति युनिट किंवा प्रति अश्वशक्ती जे विशिष्ट निश्चित रकमेइतके अनुदान देण्यात येते त्या मर्यादेपर्यंत अनुदान यापूढेही चालू राहील.

२) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या दि. १६ ऑगस्ट २०१२ च्या आदेशामुळे राज्यातील कृषीपंपधारक ग्राहकांच्या वीज दरात माहे ऑगस्ट २०१२ पूर्वीच्या तुलनेत जी वाढ करावी लागणार आहे ती कृषीपंपधारकानी भरावी.

शासनाच्या वरील निर्णयामुळे दि. १ ऑगस्ट २०१२ पासून राज्यातील कृषीपंपधारकांना खालील सवलतीचे दर लागू होतील.

| अ.क्र | वर्गवारी | स्थिर /मागणी आकार | विज आकार |
|---|---|---|---|
| | **अ. श. वर आधारीत दर** | | |
| १ | ३ अ.श. पर्यंत जोडभाराकरिता | | |
| | वर्गवारी १ | रु. ११२४ प्रति अ.श प्रति वर्ष | निरंक |
| | वर्गवारी २ | रु. १०१६ प्रति अ.श प्रति वर्ष | निरंक |
| २ | ३ अ.श. पेक्षा जास्त परंतु ५ अ.श. पर्यंत जोडभाराकरिता | | |
| | वर्गवारी १ | रु. १३२४ प्रति अ.श प्रति वर्ष | निरंक |
| | वर्गवारी २ | रु. १२१६ प्रति अ.श प्रति वर्ष | निरंक |
| ३ | ५ अ.श. पेक्षा अधिक जोडभारासाठी | | |
| | वर्गवारी १ | रु. १५४८ प्रति अ.श प्रति वर्ष | निरंक |
| | वर्गवारी २ | रु. १४२८ प्रति अ.श प्रति वर्ष | निरंक |

| | | | |
|---|---|---|---|
| | **मीटरवर आधारीत दर** | | |
| १ | ३ अ.श. पर्यंत जोडभाराकरिता | रु. ५ प्रति अ.श प्रति महिना | ५५ पैसे प्रति युनिट |
| २ | ३ अ.श. पेक्षा अधिक जोडभाराकरिता | रु. ५ प्रति अ.श प्रति महिना | ८५ पैसे प्रति युनिट |
| ३ | उच्चदाब ग्राहक | रु. ५ प्रति अ.श प्रति महिना | ९२ पैसे प्रति युनिट |
| ४ | शासकीय, सहकारी अथवा सामुदायिक उपसा जलसिंचन योजना | रु. ५ प्रति अ.श प्रति महिना | ७२ पैसे प्रति युनिट |

३) वरील (१) प्रमाणे लागू होणा-या सवलतीच्या दराव्यतिरिक्त (देय असल्यास) इंधन समायोजन आकार किंवा अन्य प्रकारचा दंडात्मक आकार कृषीपंपधारक ग्राहकांनी भरणे आवश्यक राहील.

४) वरील प्रमाणे देण्यात येणा-या वीज दरातील सवलतीमुळे महावितरण कंपनीस होणारी महसुलाची नुकसान भरपाई करण्यासाठी आतापर्यंत राज्य शासनाकडून देण्यात येत असलले अनुदान यापूढेही चालू राहील.

५) सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजे दि. १ ऑगस्ट २०१२ पासून करण्यात यावी.

६) वरील सवलतीचे दर पुढील शासन आदेश निर्गमित होईपर्यंत लागू राहतील.

याबाबतीत सर्व क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात येते की, दि. १ ऑगस्ट २०१२ पासून पुढील कालावधीकरिता शासनाच्या सवलतीच्या दरानुसार कृषीपंपधारक ग्राहकांना वीज देयके वितरीत करण्यात यावीत. या निर्णयापोटी ग्राहकांकडून वसुल करावयाच्या रकमेचे समायोजन पुढील विज देयकात करण्यात यावे.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत माहितीस रवाना :**
मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान)

-- वरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने कृषीपंपधारक ग्राहकांच्या देयकाच्या संगणक प्रणालीमध्ये आवश्यकते बदल करण्यात यावेत. तसेच वरील निर्णया स्वरुप ग्राहकांकडून वसुल करावयाच्या रक्कमेचे समायोजन त्यांचे पुढील विज देयकात करण्यात यावे.

**प्रत रवाना :- प्रेषण यादिप्रमाणे**